# माझी आजी

माझी आजी प्रेमळ फार
गोष्टी सांगे चार चार
उन्हात म्हणते नको जाऊ
देईन तुला छानसा खाऊ
पोळीला देईन रोज शिकरण
अशी माझी आजी सुगरण
खेळते खेळ माझ्याशी
लबाडी न चाले तिच्याशी
चुकेल तेव्हा रागावते
कधी डोळे मोठ्ठे करते
"बोलणार नाही", धाक घालते
तेव्हा मी फार घाबरते
प्रेमळ हात फिरविते
तेव्हा कुशीत तिच्या मी शिरते

**--- शीला नीलकंठ**